**VJTI MUMBAI**
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in

15 DEC 2022

क्र.लेखा/शिवृ./डॉ.पं.दे.सा.उ.शि.दे.शि.यो./२०२२-२३/५१९६१ /२०२२ दिनांक:१५/१२/२०२२

# डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना
## शैक्षणिक वर्ष २०२२-२३
## (मराठा, कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा विद्यार्थ्यांकरीता)

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता संस्थेतील फक्त **प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष पदवी** (Degree), **एम.सी.ए.** (M.C.A), **आणि एम.टेक** (M.TECH.) अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या **मराठा, कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा** प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांसकडून भारतातील नामंकीत २०० विद्यापीठ / महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या लक्षित गटांतील ३०० पात्र विद्यार्थ्यांना **डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती योजना** सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेकरीता विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असून त्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण **वार्षिक उत्पन्न ८.००** च्या खालील मर्यादेत असावे.

**या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ खालीलप्रमाणे असतील :**

अ) सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले **पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक इत्यादी शुल्क** विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केले जाईल.

ब) शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेने आकरणी केलेले शुल्क तसेच भोजन शुल्काची सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यास पात्र असतील.

क) जे विद्यार्थी वसतीगृहात जागेअभावी अन्यत्र राहात असतील अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात येत असलेल्या (वसतिगृह शुल्क व भोजन शुल्क) रक्कमेच्या मर्यादेत सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यास पात्र असतील.

ड) योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यास अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी रू.२५,०००/- व शैक्षणिक साहीत्य तसेच, इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण रू.२५,०००/- अशी **एकूण रू.५०,०००/-** प्रत्येक वर्षी संबंधित विद्यार्थ्यास त्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर दोन टप्प्यात अदा करण्यात येईल.

या योजनेचा लाभ घेण्याकरीता विद्यार्थ्यांनी **ऑफलाईन** अर्ज भरून सदर अर्ज व संबंधित कागदपत्र जोडून **मा.व्यवस्थापकीय संचालक, बालचित्रवाणी इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोड च्या मागे, पुणे (महाराष्ट्र) ४११००४** या पत्यावर प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे **दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यत सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत** पोहचणे गरजेचे आहे.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA, MUMBAI -19.

अध्यक्ष
शिष्यवृत्ती समिती

प्रत : सर्व विभागप्रमुख, विभाग सुचना फलक, वसतीगृह, ग्रंथालय, टिपीओ, संस्थेचे संकेतस्थळ

टीप : योजनेचा अर्ज, अटी व शर्तीचे माहीतीपत्रक संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner